''नागरीकांचे प्रभावी शस्त्र''

# माहितीचा अधिकार अधिनियम २००५

## जोडपत्र 'ब' नियम ५ (१)

## कलम १९ (१) अन्वये पहिले अपील




प्रथम

अपिलकर्त्याचे संपूर्ण नाव : ~~संदीप एम. गोरडवार, मु- पुलखल, पो- कनेरी,~~

पत्ता : मु पुलखल पो- कनेरी ता.व जि. गडचिरोली

प्रति,

मा. (प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे नाव, पद, पत्ता) : मा. सचिव तथा प्रथम अपिलीय अधिकारी, कृषि उत्पन्न बाजार समिती, गोकुलनगर गडचिरोली

१) अपिलकर्त्याचे संपूर्ण नाव : संदीप एम. गोरडवार

२) अपिलकर्त्याचा पत्ता : मु. पुलखल, पो- कनेरी ता.व जि. गडचिरोली

३) शासकीय जन माहिती अधिकाऱ्याचा तपशिल : मा. प्रशासकीय अधिकारी, तथा जनमाहिती अधिकारी कृषि उत्पन्न बाजार समिती गोकुलनगर, गडचिरोली

४) ज्या आदेशाविरुध्द अपील केले असेल तो आदेश प्राप्त झाल्याची तारीख (आदेश मिळाला असल्यास) : नाही

५) अपील दाखल करण्याची अंतिम तारीख : दि. 18/01/2021

६) अपिलाची कारणे : दि. 18/12/2020 ला जनमाहिती अधिकारी कृषि उत्पन्न बाजार समिती कडे जोडपत्र 'अ' अन्वये माहिती मागितली असता, जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे जोडपत्र ब अन्वये प्रथम अपील दाखल करीत आहे. जनमाहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी. व संपूर्ण माहिती विनामुल्य देण्याचे करावे, हि विनंती

७) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : सन 2018-2021 पर्यंत शेतकऱ्यांच्या धान्याची खरेदी-विक्री संबंधीत नस्तीसहीत माहिती

अ) आवश्यक माहितीचे स्वरुप व विषय : सन 2018-21 पर्यंत शेतकऱ्यांकडून केलेल्या धान्य खरेदी विक्री संबंधीत नस्तीसहीत माहिती

ब) माहितीशी संबंधित विभागाचे किंवा कार्यालयाचे नाव व पत्ता : मा. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यालय, गोकुलनगर, गडचिरोली

माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १०३६/२०२१**

**अपिलार्थी, श्री. मंदिप मारोती गोरडवार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
कृषि उत्पन्न बाजार समिती गडचिरोली, ता.जि. गडचिरोली

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
कृषि उत्पन्न बाजार समिती गडचिरोली, ता.जि. गडचिरोली

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १३.०२.२०२३**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १८.१२.२०२० | १९.१२.२०२० | १८.०१.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १८.१२.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १) सन २०१८ ते २०२१ पर्यंत शेतक-याकडून धान्य खरेदी-विक्री करीता सातबारा घेवून नोंद केलेल्या रजिस्टरच्या सत्यप्रती नस्तीसहीत २) शेतक-याकडून धान्य खरेदी करुन शेतक-यांना दिलेल्या बिल बुकाच्या पावत्यांच्या सत्यप्रती ३) शेतक-यांनी विक्री केलेल्यांची नावाची यादी ४) प्रत्येक वर्षी खरेदी केलेल्या एकूण धान्याची माहिती " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये, मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ, औरंगाबाद यांनी अपील क्रमांक ७०६९/२०१८ दिनांक २५.०७.२०१९ अन्वये श्री. बालाजी बळीराम बंडे रा.मु.पो.मुखेड जि. नांदेड विरुध्द १) जन माहिती अधिकारी, कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड जि. नांदेड २) प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड जि. नांदेड या प्रकरणात कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती अधिकार अधिनियम लागू होतो किंवा कसे या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फार स्पेशल लिव्ह अपिल ©.......CC ३५९३/२०१६ कृषि उत्पन्न बाजार समिती विरुध्द मुख्य माहिती आयुक्त आणि इतर या प्रकरणात दिनांक २९.०२.२०१६ रोजी स्थगिती आदेश दिलेला आहे. तरी आपणाकडे हया संदर्भात या व्यतिरिक्त वेगळा न्याय निवाडा असल्यास आम्हाला पुरवावा, असल्यास त्यासंबंधाने विचार करणे सोईचे होईल, असे अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे.

कार्यालय
कृषी उत्पन्न बाजार समिती, गडचिरोली
आवक क्रमांक 905/2023
दिनांक 28/6/2023

त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होऊन **दिनांक १८.०१.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती न दिल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.०२.२०२१ रोजी सुनावणी आयोजित केल्याचे आढळून येते. परंतू प्रत्यक्षात सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे आढळून येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १९.०४.२०२१ रोजी** " माहिती मिळाली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १३.०२.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती मागितलेली आहे. परंतु कृषी उत्पन्न बाजार समितीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो किंवा कसे, यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात पिटीशन फार स्पेशल लिव्ह अपील (C) ---CC3593/2016 कृषी उत्पन्न बाजार समिती विरुध्द मुख्य माहिती आयुक्त आणि इतर या प्रकरणात दि. २९.०२.२०१६ रोजी स्थगिती आदेश दिलेले आहेत. सदरचे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे जोपर्यंत मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडून या विषयावर अंतिम आदेश पारीत केला जात नाही, तोपर्यंत या प्रकरणात आयोगाकडून आदेश पारीत करणे यथोचित होणार नाही. **याबाबतीत मा. राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठाने श्री. बालाजी बंडे विरुध्द कृषी उत्पन्न बाजार समिती मुखेड,जि.नांदेड, अपील क्र.७०६९/२०१८ यात दिनांक २५.०७.२०१९ रोजी याच प्रकारचा निर्णय दिलेला असल्याचा लेखी खुलासा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आलेला आहे.** ही बाब लक्षात घेता, सदर प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय प्राप्त होईपर्यंत कोणतेही पुढील आदेश पारीत करणे संयुक्तिक होणार नाही. दरम्यान अपिलार्थी यांनी सादर केलेल्या माहिती अर्जातील माहितीत प्रथमदर्शनी व्यापक जनहित लक्षात घेता, जर कृषि उत्पन्न बाजार समिती गडचिरोली यांचेकडे नस्ती स्वरुपात माहिती उपलब्ध असल्यास ती स्वंयप्रेरणेने जारी करणे अधिक संयुक्तिक ठरेल, या सुचनेसह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

**प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १३.०२.२०२३**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

जावक क्रमांक 4418 दिनांक 20 JUL 2023

M-2023/1036-2021/गोरडवार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /२५६०+२५६१+२५६२+२५६३+२५६४+२५६५+२५६६+
२५६७/२०२१/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| राजाराम ए. टोके | सचिव,मंचर कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे | सचिव,मंचर कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे |

<u>व्दितीय अपील सुनावणी दिनांक- १९.०६.२०२३</u>

अपिलार्थी यांनी दि.२७/०५/२०२१ रोजी राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ पुणे यांचे कडे कलम १९(३) अन्वये एकूण ८ द्वितीय अपीले दाखल केली. अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करताना 'माहिती देण्यास टाळाटाळ केली' असे प्रयोजन नमूद केले.

आयोजित सुनावणीस विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

१. अपिलार्थीचे ८ ही माहिती अर्ज दिनांक २३/०१/२०२१ रोजीचे आहेत. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, मंचर कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे यांनी दिनांक ०५/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले की, कृषि उत्पन्न समितीला माहिती कायदा लागू होत नाही, त्याबाबतचे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामध्ये अंतीम निर्णय झाल्यानंतर नव्याने माहिती अर्ज दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेऊ शकता, असे उत्तर दिले.
२. अपिलार्थीचे ८ ही प्रथम अपिल दि.१३/०३/२२१ रोजीचे असुन त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मंचर यांनी फेटाळला.
३. सुनावणीचे वेळी श्री.सचिन बोऱ्हाडे, प्र.सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मंचर यांनी सूचित केले की, मंचर, कृषि उत्पन्न बाजार समिती, ही स्वायत्त संस्था आहे. सदर संस्थेला माहिती कायदा लागू नाही. हया संस्थेला शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनुदान मिळत नाही. तसेच सदर समिती अधिनियमातील कलम २ज नुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत बसत नसल्यामुळे माहिती कायदा लागू होत नाही. शासनाने महाराष्ट कृषि उत्पन्न खरेदी विक्री विकास अधिनियमन १९६३ अन्वये कायदा लागू होत नाही.
४. सुनावणीस अपिलार्थी गैरहजर होते. त्यांनी दि.०८/०६/२०२३ रोजी आयोगास लेखी निवेदन सादर केले. त्यामध्ये त्यांनी नमुद केले आहे की, मंचर, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे ही महाराष्टद्य कृषी पणन अधिनियम १९६३ नुसार शासन नियंत्रित असून शासन अनुदानित आहे, तरी शासकीय कायदा व नियमानुसार संबंधितावर कारवाई करुन माहिती मिळण्याची विनंती केली आहे.

५. सुनावणीस अपिलार्थी गैरहजर होते. त्यांनी दि.०८/०६/२०२३ रोजी आयोगास लेखी निवेदन सादर केले. त्यामध्ये त्यांनी नमुद केले आहे की, खेड, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे ही महाराष्ट्र कृषी पणन अधिनियम १९६३ नुसार शासन नियंत्रित असून शासन अनुदानित आहे, तरी शासकीय कायदा व नियमानुसार संबंधितावर कारवाई करुन माहिती मिळण्याची विनंती केली आहे.

आयोगाकडील उपलब्ध अभिलेख व सुनावणी दरम्यान झालेल्या युक्तीवादावरुन असे दिसून येते की, कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती कायदा लागू होतो किंवा कसे या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह अपील क्र.३५९३/२०१६ मध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती विरुध्द मुख्य माहिती आयुक्त व इतर यांचे आदशाचे विरुध्द दि.२९/०२/२०१६ रोजी स्थगिती आदेश दिलेले आहेत. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने सर्वोच्च न्यायालयामध्ये या प्रकरणात अंतीम निर्णय होईपर्यंत कृषि उत्पन्न बाजार समिती संदर्भात पुढील निर्णय देणे उचित ठरणार नाही. ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

प्रस्तुत ८ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र. २५६०+२५६१+२५६२+२५६३+२५६४+२५६५+२५६६+२५६७/२०२१/पुणे / 4701 / 2023
दिनांक - 6/11/23